**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : केमाअ-२००६/११०२/प्र.क्र.४४/०७/५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१.०५.२००७
पहा :- सा.प्र.वि.शा.प. क्र.केमाअ-२००५/प्र.क्र.४३०/०५/५, दि.२०.०१.२००६

**परिपत्रक :**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २५ मधील तरतूदींनुसार राज्य माहिती आयोगाला या अधिनियमाच्या प्रत्येक वर्षातील अंमलबजावणीबाबतचा अहवाल तयार करण्याकरिता या अधिनियमाच्या अंमलबजावणीसंदर्भातील विविध बाबींवरील माहिती विहित विवरणपत्रात दरमहा या विभागाकडे पाठविण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना उपरोक्त नमूद दि.२०.०१.२००६ च्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. सदर शासन परिपत्रकातील विवरणपत्र-३ हे अपिलीय प्राधिकाऱ्याकडून कसूरदार जन माहिती अधिकाऱ्याविरूद्ध करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईची माहिती देण्याबाबत आहे. त्यानुसार विविध मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त झालेल्या या विवरणपत्र-३ मधील माहितीचे अवलोकन केले असता काही प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी संबंधित जन माहिती अधिकाऱ्याविरूद्ध दंडात्मक कारवाई केली असल्याचे दिसून आले आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदींनुसार कसूरदार जन माहिती अधिकाऱ्याविरूद्ध दंडात्मक कारवाई करण्याचे व संबंधित अधिकाऱ्याविरूद्ध शिस्तभंग विषयक कारवाईची शिफारस करण्याचे सर्व अधिकार राज्य माहिती आयोगास प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे या अधिनियमांतर्गत एखाद्या जन माहिती अधिकाऱ्याविरूद्ध प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने दंडात्मक कारवाई करण्याचे किंवा शिस्तभंग विषयक कारवाई करण्याचे आदेश पारित करण्याची बाब या अधिनियमातील तरतूदींशी विसंगत आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. तसेच उपरोक्त नमूद केल्यानुसार दंडात्मक कारवाईचे सर्व अधिकार राज्य माहिती आयोगास असल्याने दि.२०.०१.२००६ च्या शासन परिपत्रकासोबतचे विवरणपत्र-३ रद्द करण्यात येत असून या विवरणपत्र-३ मध्ये आता या विभागाकडे माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही याचीही संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०५३१११२५४०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज.व.दिवाण)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव,
*७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*८) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
*९) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
*११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*१२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
१३) राज्य माहिती आयोग (१० प्रती)
१४) सर्व राज्य माहिती आयुक्त
१५) सर्व विभागीय आयुक्त,
१६) सर्व जिल्हाधिकारी / जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
१८) सर्व मंत्रालयीन विभाग,
१९) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग / कार्यालय प्रमुख,
२०)सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२१) निवड नस्ती. (२ प्रती)

* (पत्राने)